# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट १२/२०२५ दि. ०८/०१/२०२५

**"सायबर क्राईम जनजागृती व ड्रग्स चे दुष्परिणाम" या विषयावर पथनाटय स्पर्धेचे आयोजनाबाबत**

दिनांक ०८/०१/२०२५ रोजी रायझिंग डे निमित्त मिरा-भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-३ विरार यांचे तर्फे जुने विवा कॉलेज विरार प. येथे **"सायबर क्राईम जनजागृती व ड्रग्स चे दुष्परिणाम"** या विषयावर पथनाटय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर पथनाटय स्पर्धेकरीता परिमंडळ-३ मधील १) मुलजीभाई मेहता स्कुल २) जॉन-२३ शाळा ३) एक्सपर्ट स्कुल ४) रॉयल ॲकेडमी ५) मॅट्रीक्स स्कुल ६) संत लिला स्कुल ॲण्ड ज्युनीयर कॉलेज ७) सेंट मेरी स्कुल ८) काशिबाई पाटील विद्या निकेतन ९) विद्या विहार शाळा १०) वि.वा.कॉलेज ११) जि.प.नेहरु हिंदी स्कुल १२) बापुजी बाबाजी जाधव विद्या मंदीर १३) रामकृष्ण इंग्रजी स्कुल १४) ट्री हाऊस १५) सेंट जोसेफ कॉलेज, सत्पाळा या शाळा,महाविद्यालय यांनी भाग घेतला होता. सदर पथनाट्य स्पर्धेमध्ये खालील प्रमाणे संघ विजयी झालेले आहेत.

१) काशिबाई पाटील विद्यानिकेतन प्रथम क्रमांक
२) मुलजीभाई मेहता स्कुल द्वितीय क्रमांक
३) मॅट्रीक्स स्कुल तृतीय क्रमांक

वरील विजेत्या संघाना मा.पोलीस आयुक्त सो. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे तर्फे ट्रॉफी तसेच बक्षीसपत्र देवून गौरविण्यात आले. तर उर्वरीत स्पर्धक यांना उत्तेजनार्थ ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सदर पथनाटय स्पर्धेच्या आयोजनामागे जनतेमध्ये विशेषत: तरुणपिढी मध्ये सदर बाबत जनजागृती व्हावी हा या मागील उद्देश होता.

सदर कार्यक्रमाकरीता मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मा.श्री.मधुकर पाण्डेय, श्रीमती.पोर्णीमा श्रिंगी(चौगुले),पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२, श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री.विजय लगारे, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग , श्री.बजरंग देसाई,सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग व परिमंडळ ३ मधील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थीत होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन श्री.जयंत बजबळे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ यांचे हस्ते करण्यात आलेले असून सदर कार्यक्रमाकरीता ७५० ते ८०० विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थीत होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. राजेंद्र तेंडुलकर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, बोळींज पोलीस ठाणे यांनी केलेले होते. सदर स्पर्धेत पथनाटय स्पर्धेचा दांडगा अनुभव असलेले श्री.जगदीश अनंत संसारे, प्राध्यापक सेंट जोसेफ कॉलेज सत्पाळा यांनी परिक्षकाची भुमीका बजावली.

सदरचा कार्यक्रम ११.०० वा सुरु होवून १३.३० वा. पार पडलेला असून मा.पोलीस आयुक्त सो. यांचे आदेशान्वये सदरच्या कार्यक्रमाचा सांगता समारोप करण्यात आलेला आहे.




मिरा-भाईंदर , वसई-विरार पोलीस आयुक्तालय , परिमंडळ - ३ तर्फे
आयोजित
सायबर क्राईम आणि अंमली पदार्थ
विरोधी जनजागृती पथनाट्य स्पर्धा - २०२५
बुधवार दि. ०८ जानेवारी २०२५
1930



**------------00000--------------**